महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण। कंपनी मर्यादित
वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५वा मजला,
MAHADISCOM अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई.४०००५१.
फोन: (वै)२६४७४७५३ (का)२६४७४२११; फॅक्स २६४७२३६६

क्रमांक.मु.अ.(वा)/लेखा/ग्रां.पं.दिवाबत्ती/५५/२००७-No.3 1 4 1 6 दिनांक : 04 AUG 2007

परिपत्रक क्र. ६७

विषय : ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु.अठ्ठावन्न कोटी तीन लाख फक्त.

संदर्भ: १)शासन निर्णय क्र.बीजीटी २६०७/प्र.क्र.४३०१/परा-४(२२) दिनांक ३१.०७.२००७.

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्तावरील दिवाबत्तीची देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रु. ११६,०६,७०,०००/- (रु. एकशे सोळा कोटी सहा लक्ष सत्तर हजार फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे, पैकी रक्कम रु. ५८,०३,००,०००/- (रु. अठ्ठावन्न कोटी तीन लाख फक्त) शासन निर्णय क्र.बीजीटी २६०७/प्र.क्र.४३०१/परा-४(२२ ) दिनांक ३१ जुलै २००७ सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून पुस्तकी समायोजनेव्दारे म.रा.वि.वि. कं. मर्यादितला रक्कम प्राप्त झाली आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे,संबंधीत जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधीतांनी जरुर ती कार्यवाही करावी.

थकबाकीपोटी समायोजित करण्यात आलेल्या रकमेचे,ग्रामपंचायत निहाय विवरणपत्राची एक प्रत संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव,ग्रामविकास व जलसंधारण विभागमंत्रालय,मुंबई.३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.

सहपत्र:वरीलप्रमाणे

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रत सविनय सादर,

१)संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,मुंबई.

२)मुख्य महाव्यवस्थापक (वित्तव लेखा), म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,मुंबई.

प्रत सस्नेह रवाना:

१)सर्व मुख्य अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्यादित,संवसु परिमंडळ कार्यालय, माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत रवाना:

१)सर्व अधीक्षक अभियंता , संवसु मंडल कार्यालये, म.रा.वि.वि. कं.मर्यादित,

२) सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग) मुंबई

३)सर्व कार्यकारी अभियंता , संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित.

४)सर्व उपकार्यकारी अभियंते/सहाय्यक अभियंते ,संवसु उपविभागीय कार्यालये,उचित कार्यवाहीसाठी.

प्रत सविनय सादर -

मा. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई.

१३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा- मुंबई. ४०० ००५.

प्रत सविनय सादर -

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मंडळ, होल्डींग कंपनी मर्यादित, मुंबई.

२. मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

३. मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.ट्रान्समिशन कंपनी मर्यादित मुंबई.

४. मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.पॉवर जनरेशन कंपनी मर्यादित, मुंबई.

५. मा. संचालक (संचलन), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

६. मा. संचालक (वित्त), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

प्रत सस्नेह रवाना -

१. कार्यकारी संचालक -१(वितरण-वाणिज्य-समन्वय), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

२ कार्यकारी संचालक -२(वितरण-वाणिज्य), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

३ कार्यकारी संचालक -३ (वितरण -वाणिज्य), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

४ कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

५. संचालक (दवसु), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

प्रत रवाना -

१. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा)/ (कर्मचारीवर्ग)/(तांत्रिक आस्थापना)/ .
(माहिती व तंत्रज्ञान),म.रा.वि.वि.कं.मर्या, मुंबई.

२. संचालक (अं.ले.प.), म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

३. मुख्य अभियंता (वितरण)/(पा.व नि.)/(अं.सु.)/(सां.नि) /(वाणिज्य),( वि.ख.)/ पायाभूत सूधारणा /
ए.एम.आर/वि.प्र.कक्ष/ॲटमॅटेड मिटर रिडिंग कक्ष/ म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, मुंबई.

४. महाव्यवस्थापक (तांत्रिक), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

५. मुख्य अभियंता, (प्रशिक्षण संशोधन व विकास), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नाशिक.

६. मुख्य विधी सल्लागार, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

७. महाव्यवस्थापक (वित्त संस्था)/(भांडार देयक)/(मंडळ लेखा) म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

८. मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

९. महाव्यवस्थापक (तपासणी नियंत्रण कक्ष), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

१०. उप संचालक (द.व सु.), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे/नागपूर/मुंबई.

११. कंपनी सचिव , म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

१२. अधीक्षक अभियंता (विनिक), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

१३. मा. व्यवस्थापकीय संचालक,( म.रा. वि. वि.कं. मर्या)यांचे तांत्रिक सहाय्यक, म.रा. वि. वि.कं. मर्या, मुंबई.

१४. अतिरिक्त महाव्यवस्थापक ,संगणक केंद्र,म.रा.वि.वि.कं.मर्या./नागपूर/औरंगाबाद/अकोला/नाशिक/ नेरुळ/
भांडूप/कोल्हापूर/कल्याण

१५. आस्थापना अधिकारी (मनुष्यबळ व विकास), म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

१६. प्रणाली विश्लेषक, संगणक केद्र, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
भंडारा/बुलढाणा/धुळे/ जळगांव/ लातुर/ नांदेड/ पेण/सातारा/सोलापूर.

१७. अनदेशक, संगणक केंद्र, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अहमदनगर/अमरावती/चंद्रपूर/पालघर/रत्नागिरी/सांगली/यवतमाळ/

१८. निवासी वरिष्ठ लेखा परिक्षण अधिकारी (शा.ले.प), म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड/ प्रकाशगंगा.

१९. सर्व भरारी पथके, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

प्रत सस्नेह रवाना :-

उपाध्यक्ष (भिवंडी ऑपरेशन), टोरंट पावर लिमिटेड,
जुना आग्रा रोड, अंजुर फाटा, भिवंडी - ४२१०३०२.

C:\WINDOWS\Desktop\Endorsement.doc

क्र. बीजीटी २६०७/प्र.क्र.४३०१/पंरा -४.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - ३१ जुलै , २००७

Ao
Shri Satghare for NTA. plea
3/8/07

प्रति,
मुख्य अभियंता ( वाणिज्य )
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड,
प्रकाशगड, प्लॉट नं. G-९
वांद्रा ( पूर्व ), मुंबई -४०० ०५१.

विषय - ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० % अनुदान ( ३६०४०३२५ ) करिता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास दिनांक ३१.७.२००७ रोजी वितरित करण्यांत आलेले अनुदान

संदर्भ - आपले पत्र क्र. मुअ(वा ) लेखा /दि.ब.पा.पू/२६२८८, दिनांक २०.६.२००७

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपले संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. ग्रामपंचायत हद्दीतील केवळ रस्त्यावरील वीज बिलांची वीज देयके देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० % अनुदान देण्याचा शासनाने सन १९९० साली निर्णय घेतला आहे. सदर देयके त्वरित भागविण्यासाठी सदर रक्कम परस्पर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरण्याचा शासनाने सन २००३ साली निर्णय घेतला आहे.

३. सन २००७-२००८ या वर्षातील अंदाजित प्रक्षेपित मागणी रुपये ९८.१४ कोटी सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात , महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीस देणे आवश्यक असल्याचे आपण आपले दिनांक २०.६.२००७ च्या संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे

४. सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात शासनाने शासन निर्णय क्र. बीजीटी २६०७/प्र.क्र.४३०१/पंरा -४ (२२ ) , दिनांक ३१.७.२००७ अन्वये रुपये ५८.०३ कोटी पुस्तकी समायोजनाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास देण्यांत आली आहे. सदर शासन निर्णयाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

५. यास्तव याप्रकरणी त्वरित कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करण्याची व्यवस्था करावी . ही विनंती .

महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) महाराष्ट्र -१, मुंबई ४०० ००१ यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून प्रत्यक्षात पुस्तकी समायोजनाने सदर रक्कम रुपये ५८.०३ कोटी जमा करुन घेण्याची जबाबदारी आपली असल्याने याप्रकरणी कार्यवाही करुन शासनास अहवाल सादर करावा , ही विनंती . तसेच येथे स्पष्ट करण्यांत येते की, सदर रक्कम महालेखापाल कार्यालयाकडून वेळेत समायोजित करुन न घेतल्यामुळे सदर तरतूद व्यपगत झाल्यास व याबाबत ऑडीट आक्षेप आल्यास आपले कार्यालय जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी , ही विनंती . .

आपली विश्वासू,

( शि. प्र. राजपूरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

अर्थसंकल्पीय अनुदान सन २००७-२००८

३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००. इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी
ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५)
(दत्तमत)(मागणी क्र. एल -५)

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी २६०७/प्र.क्र. ४३०१ /पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक-३१ जुलै, २००७.

वाचा :-१) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३०.१.९०

प्रस्तावना :-

ग्राम पंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने एकूण रुपये ११६,०६,७०,०००/- ( रु एकशे सोळा कोटी सहा लक्ष सत्तर हजार फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रु. ११६,०६,७०,०००/- ( रु एकशे सोळा कोटी सहा लक्ष सतर हजार फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

२. सदर तरतूदीतून या शासन निर्णयाव्दारे ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज देयके अदा करण्यासाठी तरतूद रक्कम रुपये ५८,०३,००,०००/- ( रुपये अठ्ठावन्न कोटी तीन लाख फक्त ) पुस्तकी समायोजनेव्दारे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला वितरित करण्यांस या निर्णयाव्दारे शासन मंजूरी देत आहे .

३. सदर अनुदान खालील अटी आणि शर्तीच्या अधिन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास पुरतकी समायोजनेने मंजूर केलेली रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा.

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व विभागाच्या विभागीय आयुक्त यांना पाठवायाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे. तसेच समायोजित केलेल्या रकमेतून भागविलेल्या ग्रामपंचायतीची रस्त्यावरील वीज देयकांचा ग्रामपंचायत निहाय सविस्तर तपशील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणे बंधनकारक आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई आणि महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावी. व याची एक प्रत शासनास पाठवावी. विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

३. वरील मंजूर रक्कम रुपये ५८,०३,००,०००/- (रुपये अठ्ठावन्न कोटी तीन लाख फक्त) ही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास रोखीने न देता पुढे दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळाकडून शासनास येणे असलेल्या रक्कमेपोटी वसूल करण्यात यावी व खाली नमूद केलेल्या जमा लेखाशीर्षा खाली समायोजनेद्वारे जमा करण्यात यावी.

| अ. क्र. | तपशील | रक्कम (रुपये कोटीत) | जमा लेखाशीर्ष |
|---|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडील येणे असलेल्या सन २००६-२००७ मधील शासकीय कर्जावरील व्याज रक्कम रुपये ६८.५३ कोटी पैकी रुपये ५८.०३ कोटी समायोजित करण्यांबाबत | रुपये ५८.०३ | ००४९- व्याजाच्या जमा रकमा ११०- सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रम यांजकाडून व्याज ०३ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला दिलेल्या कर्जावरील व्याज (००४९००३४/०३) |

४. सदर रकमांचे पुस्तकी समायोजन महालेखापाल, मुंबई १ यांचे अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रकमांचे देयक तयार करण्यात येवू नये.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई यांनी त्यांच्या अखत्यारित आणि अधिकारात वरील विवरणपत्रानुसार सदर रक्कम रु ५८,०३,००,०००/- ( रुपये अठ्ठावन्न कोटी तीन लाख फक्त )चे पुस्तकी समायोजन करुन तसे शासनास कळवावे.

६ सदर खर्च ३६०४ स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे - २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून समायोजित करण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २००७/क्र.१० महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग ४, दिनांक १६ एप्रिल ,२००७ नुसार व या विभागाच्या कार्यासन वित्त १ च्या पत्र क्र. बीजीटी १००७/प्र.क्र.३१/वित्त -१, दिनांक ३० मे, २००७ तसेच त्यासंदर्भात उद्योग , उर्जा विभागाने ( उर्जा -३ ) यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौ ११०८ /उर्जा -३, दिनांक ३०.७.२००७ च्या टिप्पणीन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शि. प्र. राजपूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )

13C:\Backup\ashhok ddrive\d22\gr\BUDGET 2006-07CR.4303 STREET LIGHT

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)

२) मॅनेजिंग डायरेक्टर , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

३) मुख्य अभियंता ( वाणिज्य ) , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड (वाणिज्य विभाग ) ५ वा मजला , अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पू ) , मुंबई ४०० ०५१ (५ प्रती ) ( महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ०१ यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून या शासन निर्णयाप्रमाणे रक्कम समायोजित करुन घ्यावी. ही विनंती. )

४)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२ , नागपूर .

५).अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.

६)निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पर्व), मुंबई - ४०० ०५१.

७) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

८) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्रशासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्णा चेंबुरकर मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०५१.

९) अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.(वरील शासन निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून कार्यवाही करुन घेण्यांत यावी, ही विनंती

१०) विभागीय आयुक्त (सर्व)

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

१३) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत )

१४) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.

१५)उप मुख्य लेखा परिक्षक, नवीन मुंबई, वाशि/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद /नागपूर.

१६) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)

१७) कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.

१८) वित्त विभाग (अर्थसंकल्प १६ / व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.

१९) निवडनस्ती ,पंरा -४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

## विवरणपत्र

शासन निर्णय क्र., बीजीटी २६०५/प्र.क्र. ४३०१/पंरा-४ (२२), दिनांक ३१ जुलै ,२००७ सोबतचे विवरणपत्र .३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००. इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतींना १०० %अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) (मागणी क्र. एल -५)

( रु. लाखात )

| अ. क्र. | जिल्हा | या शासन निर्णयान्वये पुस्तकी समायोजनाव्दारे वितरित करण्यांत येत असलेले अनुदान<br>रुपये अंकी ( लाखात ) व अक्षरी. | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | ०.०० | |
| २ | रायगड | १५७.२९ | (रुपये एक कोटी सत्तावन्न लाख एकोणतीस हजार फक्त ) |
| ३ | रत्नागिरी | ४२.५७ | (रुपये बेचाळीस लाख सत्तावन्न हजार फक्त ) |
| ४ | सिंधुदुर्ग | ७२.१४ | (रुपये बहात्तर लाख चौदा हजार फक्त ) |
| ५ | नाशिक | १८९.२२ | (एक कोटी एकोणनव्वद लाख बावीस हजार फक्त ) |
| ६ | धुळे | ९७.५६ | (रुपये सत्त्याण्णव लाख छपन्न हजार फक्त ) |
| ७ | नंदूरबार | ५९.१३ | (रुपये एकोणसाठ लाख तेरा हजार फक्त ) |
| ८ | जळगांव | २६३.७२ | (रुपये दोन कोटी त्रेसष्ट लाख बहात्तर हजार फक्त ) |
| ९ | अहमदनगर | २८३.८२ | (रुपये दोन कोटी त्र्याऐंशी लाख ब्याऐंशी हजार फक्त ) |
| १० | पुणे | २६२.५४ | (रुपये दोन कोटी बासष्ट लाख चौपन्न हजार फक्त ) |
| ११ | सातारा | १९७.४९ | (रुपये एक कोटी सत्त्याण्णव लाख एकोणपन्नास हजार फक्त ) |
| १२ | सांगली | ९०.४७ | (रुपये नव्वद लाख सत्तेचाळीस हजार फक्त ) |
| १३ | सोलापूर | ३५१.८२ | (रुपये तीन कोटी एकावन्न लाख ब्याऐंशी हजार फक्त ) |
| १४ | कोल्हापूर | २४५.९८ | (रुपये दोन कोटी पंचेचाळीस लाख अठ्याण्णव हजार फक्त ) |
| १५ | औरंगाबाद | ७९.८३ | (रुपये एकोणऐंशी लाख त्र्याऐंशी हजार फक्त ) |
| १६ | जालना | ७६.८७ | (रुपये शहात्तर लाख सत्त्याऐंशी हजार फक्त ) |
| १७ | परभणी | २२८.२४ | (रुपये दोन कोटी अठ्ठावीस लाख चोवीस हजार फक्त ) |
| १८ | हिंगोली | ५९.१३ | (रुपये एकोणसाठ लाख तेरा हजार फक्त ) |
| १९ | बीड | ४७७.१८ | (रुपये चार कोटी सत्त्याहत्तर लाख अठरा हजार फक्त ) |
| २० | नांदेड | ८४४.३७ | (रुपये आठ कोटी चौ-येचाळीस लाख सदतीस हजार फक्त ) |
| २१ | उस्मानाबाद | २३१.७९ | (रुपये दोन कोटी एकतीस लाख एकोणऐंशी हजार फक्त ) |
| २२ | लातूर | २५८.९९ | (रुपये दोन कोटी अठ्ठावन्न लाख नव्याण्णव हजार फक्त ) |
| २३ | बुलढाणा | १४०.७३ | (रुपये एक कोटी चाळीस लाख त्र्याहत्तर हजार फक्त ) |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | अकोला | ४९.०८ | (रुपये एकोणपन्नास लाख आठ हजार फक्त ) |
| २५ | वाशिम | ९०.४७ | (रुपये नव्वद लाख सत्तेचाळीस हजार फक्त ) |
| २६ | अमरावती | २८.३८ | (रुपये अठ्ठावीस लाख अडतीस हजार फक्त |
| २७ | यवतमाळ | २२५.८८ | (रुपये दोन कोटी पंचवीस लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त ) |
| २८ | वर्धा | १०१.११ | ( रुपये एक कोटी एक लाख अकरा हजार फक्त ) |
| २९ | नागपूर | २०६.९५ | (रुपये दोन कोटी सहा लाख पंच्च्याण्णव हजार फक्त ) |
| ३० | भंडारा | ७७.४६ | (रुपये सत्त्याहत्तर लाख शेहेचाळीस हजार फक्त ) |
| ३१ | गोंदिया | ३७.८४ | (रुपये सदतीस लाख चौ-याऐंशी हजार फक्त ) |
| ३२ | चंद्रपूर | ४१.९८ | ( रुपये एकेचाळीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त ) |
| ३३ | गडचिरोली | २३२.९७ | (रुपये दोन कोटी बत्तीस लाख सत्त्याण्ण हजार फक्त ) |
| | सर्व एकूण | ५८०३..०० | (रुपये अठ्ठावन्न कोटी तीन लाख फक्त ) |

शि.प्र.राजपूरकर
( शि. प्र. राजपूरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.